**MAHARASHTRA AGRICULTURAL UNIVERSITIES EXAMINATION BOARD**

**महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ**

MCAER Building, 132/B, Bhosalenagar, Pune – 411007

020-25528519/119 https://www.mcaer.org/maueb.html E-mail: mauebpune@yahoo.co.in

No. MAUEB/Ph.D.-CET-2025/ **198** /25

Date: 04/09/2025

## प्रसिध्दीसाठी बातमी - १

## [Ph.D.-CET-2025]

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणाऱ्या विविध विद्याशाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा-२०२५ (Ph.D-CET-2025) महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे मार्फत माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर आयोजित करण्यात येत आहे.

सदर परीक्षेसाठी संबंधित विद्याशाखेचे पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी तसेच सन २०२४-२०२५ या पदव्युत्तर शैक्षणिक वर्षाच्या अंतिम सत्रांत परीक्षेस बसणारे विद्यार्थी पात्र राहातील. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे **http://www.mcaer.org** या संकेतस्थळावर उमेदवाराने स्वतः भरावयाचे आहे. अर्ज भरण्यापूर्वी संपूर्ण माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी दि. **५.९.२०२५ ते दि. १९.९.२०२५** असा राहील.

ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर परिक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने नेट बँकीग/ युपीआय/ डेबिट/ क्रेडीट कार्ड व्दारे **दि. ५.९.२०२५ ते दि. २३.९.२०२५ (दुपारी ३:००)** पर्यंत स्वीकारले जाईल. ह्या परिक्षेसंबंधित अर्ज महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांच्या कार्यालयाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

संभाव्य पात्र उमेदवारांची यादी दिनांक **२६.९.२०२५** रोजी वरील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध होईल. दि. **२६.०९.२०२५ ते ३०.९.२०२५** या कालावधीत अर्जाबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यात येईल. त्यानंतर पात्र उमेदवाराची यादी संभाव्यतः दि. **३.१०.२०२५** रोजी वरिल संकेतस्थळावर उपलब्ध होईल. उमेदवारांनी आपले **परीक्षा प्रवेश पत्र** (Admit Card) डाऊनलोड करावयाची दिनांक वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

सदर सामाईक प्रवेश परीक्षेचा संभाव्य दिनांक, उत्तरतालिका व परीक्षेचा निकाल प्रसिध्द करावयाचा कालावधी वेळोवेळी **http://www.mcaer.org** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच, सदर परीक्षेच्या वेळापत्रकात काही बदल झाल्यास तसे संकेतस्थळावर अधिसुचित करण्यात येईल. या परिक्षेसंदर्भात अधिक माहितीसाठी०२०-२५५२८५१९/८११९ या दूरध्वनी क्रमाकांवर संपर्क साधावा किंवा **cetmauebpune@gmail.com** या ईमेल वर कळवावे, असे नियंत्रक, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे कार्यालयाव्दारे कळविण्यात आलेले आहे.

स्थळ : पुणे-७
दिनांक : ४.९.२०२५

**नियंत्रक**
**महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे**

**महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिक्षा मंडळ,**
**१३२/ब, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद इमारत, भांबुर्डा, पुणे-४११ ००७**
**दुरध्वनी क्र. ०२०-२५५२८५१९/११९ ई-मेल: cetmauebpune@gmail.com**

## निवेदन - १

**(Ph.D.-CET-2025)**

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठातील आचार्य पदवी प्रवेशासाठी महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिक्षा मंडळामार्फत सामाईक प्रवेश परीक्षा-२०२५ **(Ph.D.-CET-2025)** माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये घेण्याचे नियोजित आहे. त्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया **दि. ५.९.२०२५ ते १९.९.२०२५** या कालावधीत होणार आहे. प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या www.mcaer.org या संकेतस्थळावर उपलब्ध लिंक मार्फत ऑनलाईन अर्ज भरावेत.

स्थळ: पुणे
दिनांक: ०४.०९.२०२५

स्वाक्षरीत/-
**नियंत्रक**
महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिक्षा मंडळ, पुणे

**Maharashtra Agricultural Universities Examination Board**
**MCAER Building, Bhosalenagar, Pune – 411 007**
**Phone No. 020-25528519/119 E-mail: cetmauebpune@gmail.com**

# NOTIFICATION-1

**(Ph.D.-CET-2025)**

Online applications are invited by the Maharashtra Agricultural Universities Examination Board, Pune for Common Entrance Test towards Admission to Ph.D. Degree Programs (Ph.D.-CET-2025) starting during Academic Year, 2025-26 in various agricultural streams in the Maharashtra State Agricultural Universities. The online application process will commence from **05.09.2025** and the last date for submission of online applications will be **19.09.2025**. Candidates should visit the website **www.mcaer.org** for further details.

Place: Pune
Date: 04.09.2025

**Controller**
**Maharashtra Agricultural Universities Examination Board, Pune**